**कृपया प्रसिध्दिसाठी** **16 जुलै 2009**

## चित्रनगरीतील झोपड्यांचे सर्वेक्षण रहिवाश्यांना विश्वासात घेऊन करा : राम नाईक

**मुंबई, गुरुवार :** गोरेगावच्या चित्रनगरीतील मोराचा पाडा, गौतम नगर, देवीचा पाडा, मद्रास पाडा, माळी नगर, नागरमोडी पाडा व हबाले पाडा या आदिवासी पाड्यांच्या सर्वेक्षणाबाबत रहिवाश्यांना विश्वासात घेण्याचे आश्वासन चित्रनगरीचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री. संजय पाटील यांनी माजी केंद्रिय मंत्री श्री. राम नाईक यांना दिले आहे. सर्वेक्षण करताना झोपडीधारकांऐवजी भलत्याच नागरिकांचे फोटो व ठसे घेतल्याची शंका रहिवाश्यांना वाटत असल्याने श्री नाईक यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी व्यवस्थापनाकडे आपले गा-हाणे नेले. त्यासंदर्भात काल झालेल्या चर्चेत हे आश्वासन देण्यात आले. श्री. नाईक यांच्यासोबत यावेळी मोराचा पाडा आदिवासी संघाचे अध्यक्ष श्री. किसन भोईर, आदिवासी प्रतिनिधी श्री. बिस्तुर नौशा चौधरी व श्री. शिवराम कृष्णा चौधरी, स्थानिक महिला नेता श्रीमती रुक्मिणी पवार, स्थानिक नेते श्री. राजेंद्र यादव व श्री. किरण साळवे उपस्थित होते.

जून महिन्यामध्ये कोणतीही पूर्वसूचना न देता चित्रनगरी प्रशासनाच्या वतीने खाजगी यंत्रणेमार्फत झोपड्यांची गणना केली गेली. अनेकांची छायाचित्रे काढली गेली, स्वाक्ष-याही घेतल्या गेल्या. हे सर्वेक्षण कशासाठी आहे हेही सांगितले गेले नाही, उपस्थित कोणाचीही छायाचित्रे घेतली गेली त्यामुळे स्थानिक नागरिकांत शंकेचे वातावरण निर्माण झाले. त्यांनी माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांच्याकडे धाव घेतली. त्यानंतर श्री. नाईक यांनी काल चित्रनगरीचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री. संजय पाटील यांची आदिवासी व रहिवाश्यांच्या प्रतिनिधींसह भेट घेतली. यावेळी पूर्वसूचना न देता खाजगी यंत्रणेमार्फत सर्वेक्षण झाल्याने त्याची सत्यता रहिवाश्यांच्या झोपड्यांत जाऊन महसूल अधिका-यांमार्फत तपासण्याचा आग्रह श्री. नाईक यांनी धरला. त्यावर सर्वेक्षणाबाबत रहिवाश्यांना विश्वासात घेण्याचे आश्वासन चित्रनगरीच्या व्यवस्थापनेने दिले. चित्रनगरीच्या जमिनीवर राहाणारी अनेक आदिवासी कुटुंबे वर्षानुवर्षे तिथेच शेती करतात, भाज्या पिकवितात. झोपड्यांची नोंद करताना आदिवासी ज्या जमिनीवर शेती करतात त्यांचीही नोंद केली जावी. तसेच आदिवासींचे हक्क अबाधित राहून त्यांना सर्व शासकीय सुविधा मिळतील असा आग्रह ही चर्चेच्यावेळी करण्यात आला. त्यावर या संदर्भात वरिष्ठांकडून आदेश प्राप्त करुन घेण्यासाठी उचित पावले उचलण्याचे आश्वासनही श्री. पाटील यांनी दिले.

या वस्त्यांचा दिंडोशीकडे शाळा, दुकाने, रुग्णालय यासाठी जाणारा वहिवाटीचा रस्ता भिंत बांधून बंद करण्यात आला आहे. त्यामुळे रहिवाश्यांची मोठीच गैरसोय होत आहे. तसेच त्यामुळे तेथिल सार्वजनिक शौचालय साफ करण्यासाठी किंवा पिण्याच्या पाण्यासाठी महापालिकेचा टँकरही येऊ शकणार नाही, अशी स्थिती निर्माण झाली आहे. या परिस्थितीवर 15 दिवसांत तोडगा काढण्याचे आश्वासनही श्री. पाटील यांनी दिले असल्याचे श्री. राम नाईक यांनी प्रसिध्दि पत्रकात म्हटले आहे.

**(कार्यालय सचिव)**